

अनाधिकृत बांधकामे व अतिक्रमणावर कडक कारवाई करा

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | गुरुवार दिनांक 10/07/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 152 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# मारुंजीतील वीजपुरवठा सुरळीत करा - खा.सुप्रिया सुळे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मारुंजी येथील लाईफ रिपब्लिक टाऊनशीप सोसायटी आणि जांभे गावात मागील चार दिवसात केवळ चारच तास वीज पुरवठा असल्याने परिसरातील नागरी जीवन विस्कळीत झाले आहे. 'महावितरण'ने तांत्रिक अडचणी दूर करून लवकरात लवकर या भागातील वीजपुरवठा सुरळीत करावा, असे आवाहन खासदार सुप्रिया सुळे यांनी 'एक्स' या समाजमाध्यमावर पोस्ट करून केले आहे.



"मारुंजी येथील लाईफ रिपब्लिक टाऊनशीप सोसायटीसह परिसरातील अनेक ठिकाणी अद्याप देखील वीजपुरवठा सुरळीत झाला नाही. गेली कित्येक तास वीज नसल्याने नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. महावितरणने तांत्रिक अडचणी दूर करून लवकरात लवकर या भागातील वीजपुरवठा सुरळीत करावा," असे खासदार सुळे यांनी पोस्ट केले आहे. 'महापारेषण' कंपनीने नियोजित देखभाल, दुरुस्तीच्या कामासाठी रविवारी (६ जुलै) सकाळी अकरा ते दुपारी एक या कालावधीत वीजपुरवठा बंद केला होता. मात्र, देखभाल दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर वीजपुरवठा सुरू करताना 'इन्फोसिस ते पेगासस' या भूमिगत वीज वाहिनीत दुपारी सव्वादोनच्या सुमारास मोठा बिघाड झाला. त्यामुळे महावितरणच्या हिंजवडी, एमआयडीसी आणि आयटी पार्क परिसरातील ९१ उच्चदाब व सुमारे ५२ हजार लघुदाब वीजग्राहकांचा वीजपुरवठा विस्कळीत झाला होता.

त्यात पिंपरी विभागातील २० हजार, तर मुळशी विभागातील ३२ हजार घरगुती, लघुदाब ग्राहकांना फटका बसला. मात्र, घरगुती ग्राहकांना पर्यायी मार्गाने, तर काही आयटी उद्योगांना चक्राकार पद्धतीने वीजपुरवठा सुरू करण्यात आल्याची माहिती महावितरणकडून देण्यात आली होती.

# तुकडेबंदी कायदा रद्द करणार!

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची विधीमंडळात घोषणा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळात एक मोठी घोषणा केली आहे. सरकार तुकडेबंदी कायदा रद्द करणार असल्याचं त्यांनी जाहीर केलं. दरम्यान, महसूलमंत्र्यांनी घेतलेल्या या निर्णयाचं विरोधकांनी देखील स्वागत केलं आहे.हा कायदा रद्द केल्यामुळे ५० लाख शेतकऱ्यांना याचा फायदा होणार असल्याचं सरकारने म्हटलं आहे. यावेळी बावनकुळे यांनी स्पष्ट केलं की वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक समिती यासंबंधीची मार्गदर्शक तत्त्वे तयार करणार आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, "आपल्याला १ जानेवारी २०२५ ही कट ऑफ डेट ठेवून पुढे जावं लागेल (कायदा रद्द केल्यानंतर १ जानेवारी २०२५ पासूनच्या व्यवहारांसाठी नव्या नियमांची अंमलबजावणी केली जाईल.). त्यानंतर मात्र आपल्याला UDCPR ((एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमन)) प्रमाणे काम करावं लागेल.म्हणजेच नियोजन प्राधिकरणाच्या नियमाने जावे लागेल. त्यामुळे आता पुढच्या काळात अवैध बांधकामं आणि प्लॉटिंग रेग्युलराईज (नियमित) करता येणार नाहीत. १ जानेवारीपर्यंत अनेक ठिकाणी अवैध बांधकामं नियमित करण्यात आली आहेत. मात्र, शासन आता तुकडेबंदी कायदा निरस्त करण्याचा विचार करत आहे. "येत्या १५ दिवसांत आम्ही एसओपी करू. विजय वडेट्टीवार, जयंत पाटील यांच्यासह सभागृहातील सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की या एसओपीमध्ये तुम्हाला वाटतील त्या सूचना आम्हाला कळवा. एसईएस महसूलकडे तुमच्या सूचना पुढील सात दिवसांत पाठवा अशी मी सभागृहाला विनंती करतो."



- चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 10/07/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# हिंजवडी वाहतूक कोंडीवर तातडीची बैठक

## आ.शंकर जगताप यांच्या मागणीला प्रतिसाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड - हिंजवडी आयटी पार्क परिसरात रोज होणाऱ्या तीव्र वाहतूक कोंडीच्या प्रश्नाकडे आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत लक्ष वेधले होते. त्यांच्या या मागणीची तात्काळ दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १० जुलै रोजी मुंबईत उच्चस्तरीय बैठक बोलावली आहे.



ही बैठक मुंबईच्या विधान भवनात गुरुवारी (१० जुलै) दुपारी १.४५ वाजता होणार असून त्यामध्ये विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, आमदार आणि प्रशासनातील प्रमुख पदाधिकारी सहभागी होणार आहेत. आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत बोलताना सांगितले की, “हिंजवडी परिसरातील वाहतूक कोंडीमुळे हजारो कर्मचारी त्रस्त झाले आहेत.

वेळ, इंधन आणि मानसिक त्रास वाढत आहे. रस्ते, रिंगरोड, उड्डाणपूल, सार्वजनिक वाहतूक, पार्किंग यंत्रणा यावर तातडीने काम होणे गरजेचे आहे.

” तसेच त्यांनी असेही स्पष्ट केले की, “हिंजवडीसारख्या महत्त्वाच्या आयटी हबचा विकास करताना वाहतूक नियोजन आणि सुविधा याकडे दुर्लक्ष झालं आहे. त्यामुळेच हा प्रश्न मोठा बनला आहे.”

या बैठकीत हिंजवडी परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी रस्त्यांचे विस्तार, नव्या जोडरस्त्यांची निर्मिती, उड्डाणपूल, सार्वजनिक वाहतूक आणि पार्किंगची व्यवस्था यासारख्या मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. शंकर जगताप म्हणाले, “मुख्यमंत्र्यांनी इतक्या तातडीने ही बैठक बोलावल्याने नागरिकांच्या प्रश्नांची दखल घेतली गेली आहे, हे समाधानकारक आहे.

आता यातून काही ठोस निर्णय निघतील असा विश्वास आहे.

”ही बैठक हिंजवडीतील नागरिक, आयटीयन्स आणि वाहनचालकांसाठी मोठा दिलासा देणारी ठरेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

# उद्योग धंदे पिंपरी-चिंचवड मध्ये...पण बैठका पुण्यात!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक अर्चना कोठारी शर्मा यांना इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांनी पिंपरी चिंचवड शहरात उद्योग मित्र कार्यालय शाखा चालू करावी आणि एमआयडीसी परिसरातील समस्यांकडे पुण्या ऐवजी पिंपरी चिंचवड शहरात बैठका घ्याव्यात, असे निवेदन दिले. उद्योग धंदे पिंपरी-चिंचवडमध्ये... पण निर्णय घेणाऱ्या बैठका पुण्यात? लघु उद्योजकांमध्ये तीव्र नाराजी! पिंपरी चिंचवड शहरात उद्योग मित्र कार्यालय उभे करण्याची मागणी जुनीच आहे परंतु अजूनही त्यावर कोणताही शासकीय निर्णय घेण्यात आला नसल्याचे अभय भोर यांनी सांगितले.



पिंपरी-चिंचवड परिसरात हजारो लघु व मध्यम उद्योग धंदे कार्यरत असूनही, महत्वाच्या बैठका, धोरणे व निर्णय प्रक्रियेची केंद्रे पुण्यात ठेवली जात आहेत. लघुउद्योगांसाठी असणाऱ्या योजना महिला उद्योगासाठी असणाऱ्या योजना या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत नाही फक्त कागदी घोडे नाचविण्याचे काम उद्योग विभागाकडून केले जात असल्याचं दिसून येते.

"ज्या शहरात उद्योजकांची खरी कोंडी आहे, तिथेच त्यांना बोलावण्याऐवजी पुण्यात बसून निर्णय घेणे म्हणजे लघु उद्योजकांच्या प्रश्नांना केलेला दुजाभाव आहे," असा घणाघात उद्योग जगतातून होत आहे.

पुण्यात बैठकी म्हणजे हा फक्त देखावा असून उद्योग क्षेत्रासाठी आम्ही फार मोठे कार्य करत असल्याचा देखावा साजरा करण्यात येतो परंतु मूळ उद्योजकांचे प्रश्न मार्गी लागत नाहीत या बैठकांना पुरस्कार सोहळा असे नवीन रूप देण्यात आलेले आहे.

हे धोरण म्हणजे फक्त मोठ्या उद्योगांच्या हितसंबंधांची जोपासना असून, पिंपरी-चिंचवडमधील लघु उद्योजकांची अडचण, मागण्या आणि वास्तविक स्थिती याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात आहे.

फक्त पुण्यात बैठकांचे आयोजन करून लघु उद्योजकांना निर्णयप्रक्रियेतून दूर ठेवणे, हे पूर्णपणे अन्यायकारक असून, याविरोधात आता फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशन तर्फे आंदोलनाचा इशारा देण्यात आला असून लवकरात लवकर शासनाने यावर विचार करावा, असे प्रसिद्धी पत्राद्वारे अभय भोर यांनी सांगितले.

# अनैतिक संबंधातून सख्ख्या भावाची हत्या !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

चऱ्होलीतील पठारे मळा येथे झालेल्या मेंढपाळाच्या खुनाची उकल करण्यात पोलिसांना यश आले. अनैतिक संबंधातून सख्ख्या भावानेच हा खून केल्याची माहिती मंगळवारी समोर आली आहे. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, अपर आयुक्त सारंग आवाड, उपायुक्त डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली घातक शस्त्राने डोक्यावर वार करून खून केल्याचे उघड, सीसीटीव्ही फुटेज तपासले. गुंडाविरोधी पथक आणि खंडणीविरोधी पथकाने खुनाचा छडा लावला.

धनू दादा लकडे (वय ३३) असे खून झालेल्या भावाचे नाव आहे.

धनू यांची पत्नी आणि भाऊ सोमनाथ (वय १९, रा. काळे कॉलनी, आळंदी रोड) यांना पोलिसांनी अटक केली आहे. धनू मेंढपाळ होते. चहोली येथे त्यांच्या मेंढ्यांचा कळप आला होता. ५ जुलै रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास प्राईल्ड वर्ल्ड सिटी येथील सेक्युरिटी




केबिनसमोरील मैदानात धनू यांचा मृतदेह आढळून आला. घातक शस्त्राने डोक्यावर वार करून त्यांचा खून केल्याचे निदर्शनास आले. धनू यांचा लहान भाऊ सोमनाथ याने या प्रकरणात फिर्याद दिली होती.

पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल विश्लेषण व तांत्रिक बाबी तपासातून या गुन्ह्याचे गौडबंगाल उघड केले.

मृत धनू यांची पत्नी व सोमनाथ यांच्यात अनैतिक संबंध होते. अनैतिक संबंधांमध्ये अडथळा ठरत असल्याने सोमनाथने धनू यांच्या पत्नीशी संगनमत करून त्यांचा खून केल्याचे उघड झाले आहे.

# पिं.चिं.पोलीस आयुक्तालयातून 38 सराईत गुन्हेगार तडीपार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयातील ३८ सराईत गुन्हेगारांना पुणे जिल्ह्यातून तडीपार करण्यात आल आहे. ही कारवाई पोलीस उपायुक्त परिमंडळ एक आणि परिमंडळ दोन मधून करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

आगामी महानगर पालिका निवडणूका आणि गुन्हेगारीवर आळा बसवण्यासाठी ही कारवाई करण्यात आल्याचं बोललं जातं आहे. हत्या, बलात्कार, हत्येचा प्रयत्न, जबरी चोरी, विनयभंग, अपहरण, मारामारी अशा गंभीर गुन्हे असलेल्या ३८ सराईत गुन्हेगारांवर ही कारवाई करण्यात आली आहे. २० ते ४८ वयोगटातील हे गुन्हेगार आहेत.

दोन वर्षांकरिता पुणे जिल्ह्यातून त्यांना हद्दपार करण्यात आलं. तर, काही जणांना एक वर्षांकरिता तडीपार करण्यात आलं आहे. संघटीत टोळ्यांच्या प्रमुखांचा यात समावेश आहे. ही कारवाई केल्याने पोलिसांचं कौतुक होत आहे. याआधी ही शेकडो जणांवर ही कारवाई करण्यात आली आहे.




# अनाधिकृत बांधकामे व अतिक्रमणावर कडक कारवाई करा

## – आयुक्त शेखर सिंह

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड शहरातील अनाधिकृत बांधकामावर तातडीने कारवाई करण्यात यावी. फुटपाथवर अतिक्रमण होणार नाही, यासाठी पथकांची नियुक्ती करा. कारवाईमध्ये सातत्य ठेवा, असे निर्देश महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिले आहे.

शहरातील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणविरोधी मोहिमेचा आढावा आज आयुक्त सिंह यांनी घेतला. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त



प्रदीप जांभळे पाटील, सह आयुक्त मनोज लोणकर, उपायुक्त राजेश आगळे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, अमित पंडित, अतुल पाटील, निवेदिता घार्गे, प्रशासन अधिकारी किशोर ननवरे, कार्यकारी अधिकारी लक्ष्मीकांत कोल्हे, विजय सोनवणे, प्रभारी कार्यकारी अभियंता सूर्यकांत मोहिते, उपअभियंता किरण माने उपस्थित होते. आयुक्त शेखर सिंह म्हणाले, सध्या शहरात सुरू असलेली सर्व प्रकारची अनधिकृत बांधकामावर तात्काळ कारवाई करण्यात यावी. नियमातील तरतुदीनुसार अशा बांधकामांवर कारवाई करण्यापूर्वी २४ तास अगोदर नोटीस द्या. शहरातील रस्त्यालगतच्या फुटपाथवर होणारे अतिक्रमण काढण्यात यावे. सर्व प्रभाग अधिकारी व बीट निरीक्षकांनी सतर्क राहावे. कारवाईमध्ये टाळाटाळ करणारे अधिकारी, कर्मचारी यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई केली जाईल.

महापालिका हद्दीत अनियमित बांधकामे व अतिक्रमण यावर लक्ष ठेवण्यासाठी एक स्वतंत्र दक्षता पथक सक्रिय करण्यात आले आहे. या पथकाकडून मिळालेल्या अहवालाच्या आधारे संबंधितांवर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# कुणाल आयकॉन कॉंक्रिटीकरणाच्या कामाचा वेग वाढवा - शत्रुघ्न काटे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपळे सौदागर या ठिकाणी बुधवार दि.०९/०७/२०२५ रोजी प्रकल्प विभागामार्फत कुणाल आयकॉन रोड याठिकाणी सुरू असलेल्या १२ मी. व १८ मी.रस्त्याच्या कॉंक्रेटिकरण कामाची पाहणी माजी नगरसेवक तथा भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी केली.गेली अनेक दिवसांपासून कुणाल आयकॉन रस्ता अद्यावत पद्धतीने विकसित करण्याचे काम प्रकल्प



विभागामार्फत सुरु आहे. कामात येणाऱ्या विविध अडचणी मूळे रस्ता कॉंक्रिटीकरण कामाचा वेग मंदावला असल्याणे कुणाल आयकॉन रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडीची समस्येमूळे नागरिक हैराण झाले आहेत. या विषयी गांभीर्याने दखल घेत भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापु) काटे यांनी आज सदर रस्त्याच्या कामाची पाहणी केली आणि कामाचा आढावा घेतला. त्याचबरोबर ज्या ज्या ठिकाणी रस्त्यावर खड्डे झाले आहेत अश्या ठिकाणी पावसामुळे पाणी भरल्याने अपघाताची शक्यता लक्षात घेता तातडीने खड्डे बुजविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करा अश्या सूचना दिल्या आहेत.तसेच या पाहणी दरम्यान रस्त्याच्या कामाचा वेग वाढवून सदर रस्त्याचे काम पूर्ण करावे तसेच लवकरात लवकर सदर रस्ता नागरिक वाहतूकसाठी खुला करण्याच्या सूचना श्री.शत्रुघ्न काटे यांनी संबंधित विभाग अधिकारी यांना दिले.यावेळी प्रकल्प विभाग कार्यकारी अभियंता सुनील पवार,कनिष्ठ अभियंता केतकी कुलकर्णी,टी अँड टी इन्फ्रा लिमिटेड कॉर्डिनेटर भीमाशंकर भोसले,इन्फ्राकिंग कन्सल्टंट लीडर पतंगे आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# पुणे-पिंपरी-चिंचवड वाहतूक कोंडीमुक्तीसाठी आता ‘ॲक्शन प्लॅन’

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील वाहतूक कोंडीच्या समस्येबाबत विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन संपण्यापूर्वी आढावा बैठक घेण्यात येईल. त्यामध्ये महानगरपालिका, एमआयडीसी, पीएमआरडीए, राष्ट्रीय महामार्ग अशा संबंधित अधिकाऱ्यांना ‘कालबद्ध’ कार्यक्रम आखून देण्यात येईल. भूसंपादनाचा प्रमुख अडथळा असल्यामुळे मुख्यमंत्री- उपमुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य सरकार सकारात्मक भूमिका घेईल. पुणे रिंगरोड, नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर यासारख्या प्रमुख प्रकल्पांचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी ‘ॲक्शन प्लॅन’ तयार केला जाईल, असे आश्वासन कॅबिनेट मंत्री दादा भुसे यांनी दिले.




विधानसभा पावसाळी अधिवेशन मुंबई येथे सुरू आहे. त्यापार्श्वभूमीवर पुणे रिंगरोडचे काम रखडले असून, त्याला गती मिळावी. यासह शहराच्या सभोवताली व अंतर्गत रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्राधान्याने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी दौंडचे आमदार राहुल कुल आणि आमदार महेश लांडगे यांनी लक्षवेधीद्वारे केली.

आमदार राहुल कुल म्हणाले की, पुण्यातील वाहतूक कोंडीमुळे सर्वसामान्य नागरिकांना मन:स्ताप होतो आहे. शहराच्या अंतर्गत रस्त्यांवरील वाहतूक कोंडी आणि शहराला जोडणारे रस्ते आणि त्यावरील वाहतूक समस्या असे दोन वेगळे विषय आहेत. महायुती सरकारने हडपसर ते यवत आणि पुणे ते शिरुर आणि पुणे रिंगरोडच्या कामाला मंजुरी दिली. सदर मार्ग ४ वर्षांत पूर्ण करण्यात येणार आहेत. असे असले तरी निश्चित कालावधीमध्ये प्रकल्प पूर्ण होण्यासाठी समन्वय यंत्रणा तयार करावी. प्रत्येक महिन्याला बैठक घेवून प्रकल्पाची प्रगतीबाबत लोकप्रतिनिधींना अवगत करावे. रस्त्यांची दुरावस्था, अतिक्रमण आणि स्मार्ट सिटीमुळे रस्त्यांची रुंदी कमी झाली आणि फूटपाथ स्मार्ट झाले. त्यामुळे पुणे आणि परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, हिंजवडी आयटी हब, ऑटो हब, पुणे विमानतळ अशा महत्त्वाच्या ठिकाणांच्या मध्यावर असलेले पुणे-पिंपरी-चिंचवड शहर मोठ्याप्रमाणात विस्तारीत होत आहे. वाहतूक समस्या मोठ्या प्रमाणात आहे. नागरिकांमध्ये नाराजी आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये पुढील वर्षभरात १ लाखाहून अधिक वाहने रस्त्यावर येणार आहेत. तळेगाव- शिक्रापूर, वाघोली-शिरुर, हडपसर- दौंड या रस्त्याचे काम सुरू होते आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सरकारचे आभार आहेत. पण, पुणे रिंग रोड, पुणे-नाशिक महामार्गावरील नाशिक फाटा ते खेड या एलिव्हेटेड कॉरिडॉरचे काम भूसंपादनाअभावी रखडले आहे. तसेच, पुणे-बेंगलोर महामार्ग आणि हिंजवडी आयटी हब कोंडीमुक्त करण्यासाठी रस्त्यांच्या प्रस्तावित कामांना गती देण्याची आवश्यकता आहे.

अधिकारी- लोकप्रतिनिधी बैठक घ्या... पुणे-नाशिक महामार्गासाठी भूसंपादन करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपलिका, पीएमआरडीए सोबत राज्य सरकारने निधी उभारावा. हिंजवडी आयटी हबची जगभरात ओळख आहे. पण, काही दिवसांपूर्वी पावसामुळे रस्ते कॅनाॅल झाले. रस्त्यांची कामे निश्चित वेळेत पूर्ण होत नाहीत. कारण, भूसंपादनासाठी शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळत नाही. चांगला परतावा दिल्यास शेतकरी जागा देतील. भूसंपादनासाठी अडचणी येत आहेत, तर जिल्हाधिकारी प्रशासनाने ‘इंटीग्रेटेड ऑथॉरिटी’ तयार करावी. २०३० पर्यंत “महाराष्ट्र फाईव्ह ट्रिलियन इकॉनॉमी” असा संकल्प मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला आहे. त्यामध्ये पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराचे योगदान राहणार आहे. पण, त्यासाठी लागणाऱ्या मूलभूत सोयी-सुविधांमधील प्रमुख सेवा रस्ते आहेत. त्यामुळे रस्ते ट्रॅफिकमुक्त झाले पाहिजेत. यावर उपाययोजना करण्यासाठी पुणे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घ्यावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली.

पुणे रिंगरोड, पुणे-बेंगलोर महामार्ग, पुणे-नाशिक महामार्ग याच्या प्रस्तावित कामांसाठी संबंधित विभागाचे अधिकारी यांची बैठक अधिवेशन संपण्यापूर्वी नियोजित केली जाईल. स्थानिक पातळीवर असलेल्या अडीअडचणी सोडवण्यासाठी सरकार सकारात्मक आहे. शेतकऱ्यांना विश्वासात घेवून भूसंपादन करीत आहोत. 9 पॅकेजमध्ये पुणे रिंगरोड होणार आहे. त्याचे काम सुरू झाले आहे. आगामी 3 वर्षांत रिंगरोड पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

- दादा भुसे, कॅबिनेट मंत्री, महाराष्ट्र राज्य.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968